नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/०७/२०२५ (मंगळवार)**

---

## अवैधरित्या रेती चोरी आणि वाहतुक करणारा सराईत गुन्हेगार सतिष कृष्णराव गायधने याला एम.पी.डी.ए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

**सराईत आरोपी नामे सतिष कृष्णराव गायधने, वय ५१ वर्षे, रा. प्लॉट क्र ३, फ्लॅट क्रं १००, अनमोल नगर, वाठोडा रिंग रोड ,नागपुर** याचेविरूध्द अवैध रेती चोरीचे १० गुन्हे नोंद असुन त्यापैकी ०९ गुन्हे अरोली पोलीस स्टेशन येथे नोंद आहे. तो सदर गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. असे गुन्हे करून तो शासनाचा महसुल बुडवतो तसेच आरोपीच्या कृत्यु मुळे पर्यावरणाचे सुध्दा नुकसान होते. नागपुर ग्रामीण पोलीसांनी त्याचेविरूध्द वेळोवेळी कारवाई करून गुन्हे नोंद केले व त्याला अटक केले आहे. तसेच आरोपी नामे सतिष कृष्णराव गायधने याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अरोली पोलीसांकडुन एम.पी.डी.ए.कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दिनांक ०७/०७/२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत गुन्हेगार सतिष कृष्णराव गायधने याचे विरूध्द स्थानबध्दतेता आदेश काढला असता अरोली पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन त्याला मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले.



**सराईत गुन्हेगार सतिष कृष्णराव गायधने**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक ०७/०७/२०२५ रोजी भिवापुर पोलीस पो.स्टे. हददीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा मालेवाडा शिवार येथे नाकाबंदी केली असता ट्रक क्र. एम. एच. ४० सी. एम. ६६६४ हा मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **ट्रक चालक आशिष देवराव निशाने, वय २७ वर्ष, रा. दिपाळा, ता कुही जि. नागपुर** याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **वाहन मालकाचे नाव शैलेंद्र कवडुजी वैदय, रा. कुही जि. नागपुर** असे असल्याची

माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष **१)** ट्रक क्र. एम. एच. ४० सी. एम. ६६६४ किमती २०,००,०००/— रूपये **व २)** ६ ब्रास रेती किंमती ३०,०००/— रूपये आणि असा एकुण २०,३०,०००/— रूपयांचा माल जप्त करण्यात आला.

**नमुद ट्रक चालक आणि मालक याच्या विरूध्द पोस्टे भिवापुर येथे कलम ३०३(२) भा. न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चालक आरोपीस अटक करण्यात आली आहे.**

## बेपत्ता ७ वर्षीय मुलाचा तात्कळ घेतला शोध, काटोल पोलीसांची कामगिरी

दिनांक ०६/०७/२०२५ रोजी सागर दिलीपराव गजम, रा जामगाव, ता. नरखेड, जि. नागपुर हे त्यांचा मुलगा शौर्य, ७ वर्षे याला सोबत घेवुन काटोल येथे मोहरम सणाची सवारी बघण्याकरीता गेले होते. गर्दीमध्ये शौर्य हरविल्याबाबत माहीती सागर गजम यांनी पोलीसांना दिली. अशी माहीती मिळताच पोलीस निरीक्षक श्री रंजीत शिरसाठ, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन काटोल यांनी तात्काळ सदर मुलाचा शोध घेण्यासाठी एक पथक तयार करून रवाना केले. तसेच ते स्वत: सुध्दा सदर मुलाला शोधण्यासाठी रवाना झाले. गुप्त बातमीदार कडे माहीती काढण्यात आली तसेच सी.सी.टी.व्ही फुटेज तपासण्यात आले. काटोल पोलीस सदर मुलाचा शोध घेत असतांना सदर मुलगा हा बस स्टॅड, काटोल परीसरात सायकल चालवित असातांना मिळुन आला. पोलीसांनी त्याला विचारपुस केली असता त्याने सांगितले की, मोहरम पाहत असतांना तो रस्ता चुकला होता. अंदाजाने तो त्याच्या आजीच्या घरी गेला होता. पोलीसांनी सदर माहीतीची शाहनिशा केली माहीती बरोबर असल्याची पोलीसांना खात्री पटली. त्यानंतर त्यांनी शौर्य चे वडील सागर दिलीपराव गजम यांना व्हिडीओ कॉल करून संपर्क केला. त्यावेळी शौर्यचे वडील यांनी भावनिक होवुन पोलीसांचे आभार मानले. सदर मुलाला त्याचे वडील सागर दिलीपराव गजम,रा जामगाव ता. नरखेड जि. नागपुर यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. पोलीस निरीक्षक श्री रंजीत शिरसाठ, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन काटोल, श्री जवाहर चव्हाण,

पोउपनि, सफौ बावणे आणि पोलीस अंमलदार हेमराज कोल्हे यांनी कोशिशीने बेपत्ता मुलाचा तात्काळ शोध घेतल्याने मुलगा शौर्य सागर गजम, वय ६ वर्षे मिळुन आला.



## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ५९० रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०८/०७/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ५९०आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३८ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण १०१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे १८ आणि पोलीस

स्टेशन वेलतुर १६ आरोपी अशा एकुण ९० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे २५ आरोपी अशा एकुण १०६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २९  आरोपी आणि पोलीस स्टेशन खापरखेडा येथे ३३आरोपी अशा एकुण ९२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे १९ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी  येथे २४ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे १४ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार  येथे येथे १९ आरोपी अशा एकुण ७६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २९ आरोपी अशा एकुण १२५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन एकुण ५९० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**






BALENCI






## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०७/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०८/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री अनिल म्हस्के, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत सटवामाता मंदीर, पहीलेपार आणि वाघोडा  येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री अनिल म्हस्के यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. शिवाजी चौक,राजकमल चौक, गडकरी चौक, गांधी चौक येथे नाकाबंदी करून ९२ संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन सह दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.


POLICE
OPPO F27 5G
7 July 2025 at 11:34 pm







# पोलीस स्टेशन खापा मर्ग क्रं २५/२०२५

**पोलीस स्टेशन खापा :–** पोलीस स्टेशन खापा येथे मर्ग क्र २५/२०२५ नोंद असुन यातील मृतक अश्विन प्रविण वरखेडे, वय ०६ वर्ष, रा निमतलाई, ता. सावनेर, जि. नागपुर हा आहे. दिनांक ०६/०७/२०२५ रोजी सकाळी ०८:०० वा त्याचे आईवडील कामाला जात असतांना तो घरासमोरील अंगणात खेळत होता. त्यानंतर आईवडील कामावरून परत आल्यावर मृतक मिळुन आला नाही. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन खापा येथे कलम १३७ (१) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद आहे. दिनांक ०८/०७/२०२५ रोजी सुधाकर चौधरी रा. निमतलाई, ता सावनेर जि. नागपुर यांचे घराजवळ असलेल्या पाण्याचे खड्डयात त्याचे प्रेत तरंगतांना दिसले. मृतक हा खेळता खेळता त्याचा तोल जावुन तो पाण्याचे खड्डयात पडुन बुडुन त्याचा मृत्यु झाल्याबाबत माहीती त्याचे वडील प्रविण लालचंद वरखेडे, वय ३४ वर्षे, रा. आग्रापुर, पोस्ट घोराड ता. बिचबा, जि. छिंदवाडा, राज्य मध्यप्रदेश ह.मु. निमतलाई वार्ड क्रं ३ ता.सावनेर, जि. नागपुर यांनी दिली.

**सदर प्रकरणी पोलीस स्टेशन खापा येथे मृतकाचे वडील वडील प्रविण लालचंद वरखेडे यांच्या रिपोर्ट वरून अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने